पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी-४११ ०१८.

मा.स्थायी समिती

कार्यपत्रिका क्रमांक – ८१

**सभावृत्तांत**

दिनांक - ०८/१०/२०१३ वेळ - सकाळी ११.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा मंगळवार, दिनांक ०८/१०/२०१३ रोजी सकाळी ११.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१) मा.जगताप नवनाथ दत्तु - सभापती
२) मा.अविनाश (दादा) टेकावडे
३) मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके
४) मा.छाया जगन्नाथ साबळे
५) मा.भालेकर अरुणा दिलीप
६) मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब
७) मा.लोंढे गणेश नारायण
८) मा.शेंडगे आशा सुखदेव

याशिवाय मा.श्रीकर परदेशी – मा.आयुक्त, मा.तानाजी शिंदे - अति.आयुक्त, मा.गायकवाड, मा.फुंदे, मा.खांडकेकर, मा.दुरगुडे, मा.ढेरे, मा.माछरे, मा.माने – सहा.आयुक्त, मा.घाडगे – मुख्यलेखापरीक्षक, मा.गावडे – नगरसचिव, मा.कांबळे – प्र.शहर अभियंता, मा.भोसले – मुख्यलेखापाल, मा.डॉ.माटे – वैद्यकिय अधिकारी, मा.डॉ.देशमुख – प्र.वैद्यकिय अधिक्षक, मा.भदाणे - उपसंचालक (नगररचना), मा.निकम, मा.दुधेकर, मा.काची, मा.रामदास जाधव, मा.शरद जाधव, मा.चव्हाण, मा.चिंचवडे, मा.कपिले, मा.साळवी, मा.लडकत, मा.कुलकर्णी, मा.पिरजादे, मा.दांगट, मा.सय्यद, मा.बरशेट्टी, मा.थोरात, मा.पठाण, मा.गलबले - कार्यकारी अभियंता, मा.कांबळे – प्र.शिक्षणाधिकारी (माध्यमिक), मा.साळुंके – मुख्य उद्यान अधिक्षक, मा.जरांडे – सुरक्षा अधिकारी, मा.उल्हास जगताप – समाज विकास अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-------

<u>उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले :-</u>

विषय क्रमांक – २९) स्थायी समिती ठराव क्र.३६७७ मध्ये मजकुर समाविष्ट करणेबाबत.मा.गणेश लोंढे,मा.अरुणा भालेकर यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक – ३०) भोसरी उपविभागातील क प्रभागातील टाक्यांवरुन वितरण व्यवस्था करणेबाबत..मा.सुनिता वाघेरे,मा.शकुंतला धराडे यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक – ३१) मनपा आस्थापनेवरील रिक्त पदे भरणेबाबत.

विषय क्रमांक – ३२) वॉर्ड क्र.३४ मधील आरक्षण ४१४ भोसरी येथील विकसीत होणा-या उद्यानांकरीता नवीन वीजमीटर घेणेबाबत.

विषय क्रमांक – ३३) महात्मा जोतिबा फुले सार्वजनिक वाचनालय चालविणेस मुदतवाढ देणेबाबत.

विषय क्रमांक - ३४) अंदाजपत्रकात वाढ घट करणेबाबत..मा. अविनाश टेकावडे,मा.शकुंतला धराडे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक – ३५) ब प्रभागामध्ये सन २०१३ – १४ च्या अंदाजपत्रकामध्ये कामांच्या तरतुदीमध्ये फेरबदल करणेबाबत.. मा. अविनाश टेकावडे,मा.शकुंतला धराडे यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक – ३६) सन २०१३ – १४ च्या अर्थसंकल्पातील ड प्रभाग व ड मुख्यालयातील कामांच्या तरतुदीमध्ये फेरबदल करणेबाबत.. मा. अविनाश टेकावडे,मा.शकुंतला धराडे यांचा प्रस्ताव

विषय क्रमांक - ३७) तरतुद वर्गीकरण करणेबाबत.. मा. अविनाश टेकावडे,मा.शकुंतला धराडे यांचा प्रस्ताव

विषय क्रमांक - ३८) तरतुदींमध्ये फेरबदल करणेबाबत.. मा. अविनाश टेकावडे,मा.शकुंतला धराडे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक - ३९) वाढ घट करणेबाबत.. मा. अविनाश टेकावडे,मा.शकुंतला धराडे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक - ४०) तरतुद वर्ग करणेबाबत.. मा. अविनाश टेकावडे,मा.शकुंतला धराडे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक - ४१) कामांच्या तरतुदीमध्ये फेरबदल करणेबाबत.. मा. अविनाश टेकावडे,मा.शकुंतला धराडे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक - ४२) स्थापत्य विषयक कामांच्या तरतुदीमध्ये वाढ घट करणेबाबत.. मा. अविनाश टेकावडे,मा.शकुंतला धराडे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक - ४३) अ प्रभागातील तरतुदीमध्ये वाढ घट करणेबाबत.. मा. अविनाश टेकावडे,मा.शकुंतला धराडे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक – ४४) कार्यपत्रीका क्रमांक ८० ठराव क्र.४२१८ या ठरावास दुरुस्ती करणेबाबत.. मा. अविनाश टेकावडे,मा.शकुंतला धराडे यांचा प्रस्ताव

विषय क्रमांक – ४५) एम एस सी आय टी प्रशिक्षण घेणेबाबत..मा.शकुंतला धराडे,मा.अरुणा भालेकर यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक – ४६) ब प्रभागातील सन २०१३ – १४ च्या मुळ अंदाजपत्रकातील स्थापत्य विकास कामांच्या तरतुदीमध्ये वाढ घट करणेबाबत.. मा.शकुंतला धराडे,मा.अरुणा भालेकर यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक – ४७) सन २०१३ – १४ च्या अर्थसंकल्पातील ब प्रभागातील कामांच्या तरतुदीमध्ये फेरबदल करणेबाबत.. मा.अरुणा भालेकर,मा.छाया साबळे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक – ४८) झोनिपु स्थापत्य विभागातील कामाच्या तरतुदीत वाढ/घट करणेबाबत.. मा.सुनिता वाघेरे,मा.शकुंतला धराडे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक – ४९) ब प्रभागातील सन २०१३ – १४ च्या मुळ अंदाजपत्रकातील स्थापत्य विकास कामांच्या तरतुदींमध्ये वाढ घट करणेबाबत.. मा.सुनिता वाघेरे,मा.शकुंतला धराडे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक – ५०) तरतुद वर्गीकरण करणेबाबत..

विषय क्रमांक – ५१) अ प्रभागातील सन २०१३ – १४ चा मुळ अंदाजपत्रकातील स्थापत्य विषयक विकास कामाच्या तरतुदीमध्ये वाढ घट करणेबाबत .. मा.अविनाश टेकावडे,मा.शकुंतला धराडे यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक – ५२) कार्यपत्रीका क्र.८० ठराव क्र.४२१७दि.०१/१०/२०१३ या ठरावास दुरुस्ती करणेबाबत.. मा.अविनाश टेकावडे,मा.शकुंतला धराडे यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक – ५३) ***asci*** व्दारा आयोजित आंतरराष्ट्रीय प्रशिक्षण कार्यक्रमाबाबत.. मा.गणेश लोंढे,मा.सुनिता वाघेरे यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक – ५४) मा.स्थायी समिती ठराव क्र.४२२० रद्द करणेबाबत . मा.अविनाश टेकावडे,मा.शकुंतला धराडे यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक – ५५) सन २०१३ – १४ च्या अर्थसंकल्पातील ड प्रभाग व ड मुख्यालयातील कामांच्या तरतुदींमध्ये फेरबदल करणेबाबत.. मा.सुनिता वाघेरे,मा.शकुंतला धराडे यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक – ५६) महर्षी वाल्मीकी जयंती कार्यक्रम करणेबाबत.. मा.शकुंतला धराडे,मा.अरुणा भालेकर यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक – ५७) सभावृत्तांत क्र.८० मध्ये दुरुस्ती करणेबाबत.. मा.गणेश लोंढे,मा.सुनिता वाघेरे यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक – ५८) सन २०१३ – १४ च्या अर्थसंकल्पातील ड प्रभाग व ड मुख्यालयातील कामांच्या तरतुदींमध्ये फेरबदल करणेबाबत..मा.सुनिता वाघेरे,मा.शकुंतला धराडे यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक – ५९) मनपा वर्धापनदिन खर्चाबाबत.

विषय क्रमांक – ६०) मनपाचे सन २०१३ – १४ चे अंदाजपत्रकात वाढ घट करणेबाबत..मा.छाया साबळे,मा.सुनिता वाघेरे यांचा प्रस्ताव..

-----------

खालीलप्रमाणे सुचना मांडणेत आली.

सुचक - मा.अविनाश टेकावडे — अनुमोदक - मा.शकुंतला धराडे

माजी सभापती स्थायी समिती श्री.जगदीश शेट्टी सो यांचे बंधु प्रसाद शंकर शेट्टी यांचे व मुख्य वैद्यकिय अधिकारी रॉय यांच्या मातोश्री अमिनी रॉय यांचे दु:खद निधन झाले असल्याने त्यांस श्रध्दांजली वाहून सभा बुधवार दिनांक ९/१०/२०१३ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत तहकुब करण्यात यावी

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

----------.

(सर्वांनी दोन मिनीटे स्तब्ध उभे राहुन श्रध्दांजली अर्पण केली)

**मा.सभापती** :- बुधवार दिनांक दि.०९/१०/२०१३ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत सभा तहकुब करणेत येत आहे.

(जगताप नवनाथ दत्तु)
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी-४११ ०१८.

मा.स्थायी समिती

कार्यपत्रिका क्रमांक – ८१

**<u>सभावृत्तांत</u>**

( दिनांक ०८/१०/२०१३ ची तहकुब सभा )

दिनांक - ०९/१०/२०१३ वेळ - दुपारी ३.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची दिनांक ८/१०/२०१३ ची तहकुब सभा बुधवार, दिनांक ०९/१०/२०१३ रोजी दुपारी ३.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१) मा.जगताप नवनाथ दत्तु - सभापती
२) मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके
३) मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर
४) मा.छाया जगन्नाथ साबळे
५) मा.भालेकर अरुणा दिलीप
६) मा.वाघेरे सुनिता राजेश
७) मा.बारणे माया संतोष
८) मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब
९) मा.लोंढे गणेश नारायण
१०) मा.शेंडगे आशा सुखदेव

याशिवाय मा.तानाजी शिंदे - अति.आयुक्त, मा.झुरे – सह आयुक्त, मा.कुलकर्णी, मा.ढेरे, मा.खांडकेकर, मा.दुरगुडे, मा.माछरे – सहा.आयुक्त, मा.गावडे – नगरसचिव, मा.घाडगे – मुख्यलेखापरीक्षक, मा.सुरगुडे – विकास अभियंता, मा.चव्हाण - सह शहर अभियंता, मा.निकम, मा.रामदास जाधव, मा.चव्हाण, मा.शरद जाधव, ,मा.थोरात, मा.साळवी, मा.चिंचवडे, मा.खाबडे, मा.पिरजादे, मा.दांगट, मा.सैय्यद, मा.बरशेट्टी, मा.पठाण - कार्यकारी अभियंता, मा.कांबळे – प्रभारी शिक्षणाधिकारी(माध्य), मा.साळुंके – मुख्य उद्यान अधिक्षक हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

------------

दिनांक ०१/१०/२०१३ रोजी झालेल्या सभेचा ( **कार्यपत्रिका क्रमांक - ८०** ) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

ठराव क्रमांक – ४२४४ विषय क्रमांक – १
दिनांक – ९/१०/२०१३ विभाग – जलशुध्दीकरण
सुचक – मा.आशा शेंडगे अनुमोदक – मा.छाया साबळे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.जशुके/वि/०४/६०/२०१३दि.२७/०८/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या विद्युत विभागांतर्गत शुद्ध अशुद्ध जलउपसा केंद्र से.२३ विभागाकडील भांडवली कामे लेखाशिर्षकांतर्गत नविन कामाच्या पुर्णत्वासाठी अंतर्गत प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे तरतूद वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रू.२४,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४२४५ विषय क्रमांक – २
दिनांक – ९/१०/२०१३ विभाग – क्रीडा
सुचक – मा.अरुणा भालेकर अनुमोदक – मा.माया बारणे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.क्रीडा/७/कावि/८१६/२०१३दि.३१/०८/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मा.क्रिडा समिती सभा दिनांक १९/९/२०१३ ठराव क्र.३० नुसार, निविदा नोटीस क्र.१/२००७-०८ अन्वये जलतरण तलाव पाणीशुध्दीकरण, परिसर स्वच्छता, देखभाल व यांत्रिक दुरुस्ती कामाची ५ वर्षाची मुदत दि.१६/०७/२०१३ रोजी संपुष्टात आल्याने नव्याने निविदा प्रक्रिया पुर्ण करुन कामाचे आदेश देईपर्यंत तीन महिन्याचा कालावधी लागणार असल्याने ४थ्या वर्षाच्या दराने ५ व्या वर्षाचे पुढील ३ महिने कालावधीसाठी मुदतवाढ देणेस मा.आयुक्त यांचेकडील आदेश क्र.क्रीडा/७/कावि/६८६/२०१३, दि.१२/०८/२०१३ अन्वये मे.सुमित स्पोटर्स अन्ड फिटनेस इक्विपमेंटस, चिंचवड, पुणे १९ व मे.वरदायिनी एंटरप्राईजेस चिंचवड, पुणे १९ यांना प्रस्तावात नमुद केलेल्या दराने माहे नोव्हेंबर २०१३ पर्यंत कालावधीकरीता या पुर्वी केलेल्या करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार त्यांचे नावापुढे नमुद केलेल्या ११ जलतरण तलावांचा आजुबाजुचा परिसर, डेक एरिया, कार्यालय पाय-या स्वच्छता, स्वच्छतागृहे, स्नानगृह इ. रोजचेरोज साफ सफाई व जलतरण तलाव पाणी शुध्दीकरण, परिसर स्वच्छता, देखभाल व या यांत्रिक दुरुस्ती कामाचे आदेश दिल्याने त्याकामी येणा-या खर्चास मान्यता व सदर कामाची ई-निविदा नोटीस क्र.१/२०१३-१४ ची कार्यवाही करणेस प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४२४६ विषय क्रमांक – ३
दिनांक – ९/१०/२०१३ विभाग – पाणीपुरवठा
सुचक – मा.विनया तापकीर अनुमोदक – मा.गणेश लोंढे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.अप्र/पापु/कावि/८/१२७/२०१३दि.२४/०९/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

सन २०१३-१४ चे मुळ अंदाजपत्रकात पाणीपुरवठा योजना निधी, पाणीपुरवठा किरकोळ दुरूस्ती व स्थापत्यविषयक कामे व पाणीपुरवठा टप्पा क्र.१ व २ जे.एन.एन.यु.आर.एम.च्या कामासाठी प्रस्तावात नमुद प्रमाणे तरतुदी वर्ग करून घेण्यास मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट २२६.२०)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४२४७ विषय क्रमांक – ४
दिनांक – ९/१०/२०१३ विभाग – अ प्रभाग पाणीपुरवठा
सुचक – मा.सुनिता वाघेरे अनुमोदक – मा.विनया तापकीर
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.अप्र/पापु/६/कावि/२८/२०१३दि.१९/०९/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

भोसरी विभागातील नवीन गावात पाणीपुरवठा सुरळीत करणेसाठी सदर जलवाहिनी कार्यान्वित करणे आवश्यक आहे. त्यासाठी सध्या मनपाकडील मे.एस.बी.खकाळ यांचे स्वीकृत निविदा दराने काम केलेस कामाचा खर्च व वेळेची बचत होणार आहे. मे.एस.बी.खकाळ यांचे निविदेमधील दर सन २००८-२००९ चे दर सुचीनुसार असून निविदा दर ११.२५ टक्के कमी असा आहे. वरील वरील विषयांकित कामास महानगरपालिका सभा ठराव क्र.३४३ दि.१९/०८/२०१३ अन्वये प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. पिंपरी

चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाने या कामासाठी येणा-या या खर्चाची र.रू. ९२,४७,७००/- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडे जमा केली आहे. प्रत्यक्ष खर्चात काही वाढ अथवा घट झाल्यास त्यानुसार पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण व पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने खर्चाचे समायोजन करावयाचे आहे. काम तातडीने पुर्ण करणे आवश्यक असलेने मे.एस.बी.खकाळ यांचे पुर्वी स्विकृत केलेल्या से.क्र.२३ पासून गवळीमाथा संप पर्यंत मुख्य गुरुत्वनलिका टाकणे व से.क्र.१० येथे ३ द.लि.लि. क्षमतेचे संप बांधणे कामाअंतर्गत वरील विषयांकित काम करणेस व त्यासाठी येणा-या रक्कम रुपये ९२,७४,७००/- चे वाढीव खर्चास व मे.एस.बी.खकाळ यांचेशी करारनामा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४२४८ विषय क्रमांक – ५

दिनांक – ९/१०/२०१३ विभाग – ब प्रभाग पाणीपुरवठा

सुचक – मा.शकुंतला धराडे अनुमोदक – मा.चंद्रकांत वाळके

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.पापु/बप्र/२/२६/२०१३दि.२६/०९/२०१३

विषय :- अंदाजपत्रकीय तरतुद वर्गीकरण करणेबाबत..

विषय क्रमांक ५ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४२४९ विषय क्रमांक – ६

दिनांक – ९/१०/२०१३ विभाग – मध्यवर्ती भांडार

सुचक – मा.माया बारणे अनुमोदक – मा.छाया साबळे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मभा/५/कावि/५०/२०१३दि.२७/०९/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मध्यवर्ती भांडार विभागाचे विषयपत्रानुसार महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन परिपत्रक क्र.सी.ए.टी./०९/०५/प्रक्र३९/इमारती-२ मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ दि.१५.५.२००७ अन्वये निविदा संचाची किंमत ठरविणेत आलेली आहे. सदर निर्णयानुसार खालील प्रमाणे निविदा फॉर्म विक्री संचा दरामध्ये दरवाढ करणेत आलेली आहे. सदर दरवाढीस मान्यता देणेत येत आहे

| अ.क्र | तपशिल (कामाची एकूण रक्कम) | शासनाकडील दर | परिपत्रकानुसार यापुर्वीचे निविदा संच दर | प्रस्तावीत करावयाचे निविदा संच दर |
|---|---|---|---|---|
| १ | र.रु. ५० हजाराचे आतील कामासाठी | -- | १००/- | २००/- |
| २ | र.रु. ५० हजार ते १ लाखापर्यंत | -- | १५०/- | ३००/- |
| ३ | र.रु. १ लाख ते २ लाखापर्यंत | | २००/- | ५००/- |
| ४ | र.रु. २ लाख ते ५ लाखापर्यंत | | ३००/- | ७५०/- |
| ५ | र.रु. ५ लाख ते १० लाखापर्यंत | | ५००/- | १,०००/- |
| ६ | र.रु. १० लाख ते १५ लाखापर्यंत<br>र.रु. १५ लाख ते ५० लाखपर्यंत | ५००/-<br>१०००/- | ७५०/- | १,५००/- |
| ७ | र.रु. ५० लाख ते १ कोटीपर्यंत | ५,०००/- | १,०००/- | २,०००/- |
| ८ | र.रु. १ कोटी ते २ कोटी | | १,५००/- | ३,०००/- |
| ९ | र.रु. २ कोटी ते ५ कोटी | १०,०००/- | -- | १०,०००/- |
| १० | र.रु. ५ कोटी ते १० कोटी | १५,०००/- | -- | १५,०००/- |
| ११ | र.रु. १० कोटी ते ५० कोटी | २५,०००/- | -- | २५,०००/- |
| १२ | र.रु. ५० कोटी पेक्षा जास्त | ५०,०००/- | -- | ५०,०००/- |

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४२५० विषय क्रमांक – ७

दिनांक – ९/१०/२०१३ विभाग – नगरसचिव

सुचक – मा.आशा शेंडगे अनुमोदक – मा.सुनिता वाघेरे

संदर्भ:- मा.नगरसचिव यांचे जा.क्र.नस/१/कावि/१३५७/२०१३दि.२७/०९/२०१३

मा.नगरसचिव यांनी शिफारस केलेप्रमाणे

नगरसचिव विभागामध्ये कार्यरत असणा-या कर्मचा-यांनी रजा मंजूरीकामी सादर केलेल्या विनंती अर्जानुसार प्रस्तावा सोबतचे प्रपत्र 'अ' मध्ये दर्शविलेप्रमाणे रजा मंजूरीस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४२५१ विषय क्रमांक – ८

दिनांक – ९/१०/२०१३ विभाग – विद्युत उद्यान

सुचक – मा.छाया साबळे अनुमोदक – मा.विनया तापकीर

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.वि/भुगयो/तां/कावि/२०९/२०१३दि.२७/०९/२०१३

विषय :- सन २०१३ – १४ चे अंदाजपत्रकातील तरतुदीचे विद्युत भुगयो या लेखाशीर्षांतर्गत वर्गीकरण करणेबाबत..

विषय क्रमांक ८ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४२५२ विषय क्रमांक – ९

दिनांक – ९/१०/२०१३ विभाग – अ प्रभाग स्थापत्य

सुचक – मा.माया बारणे अनुमोदक – मा.सुनिता वाघेरे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था/अप्र/कावि/१८५०/२०१३दि.२५/५/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे

"अ" प्रभागातील अ प्रभाग क्र. १४ वाहतुकनगरीमध्ये पार्किंग प्लॉटमध्ये सुधारणा (pavement quality concrete ) आराखड्यातील रस्त्यांच्या कामाचे पुर्वगणनपत्रक तयार करणे (Estimate), विविध निविदा पुर्व (Pretender Activity)व निविदा पश्चात (Post Tender Activity)बाबींसाठी सल्लागार म्हणून मे.सी.व्ही.कांड कन्सल्टंट यांची नेमणुक करणे व त्यासाठी महापालिकेच्या विविध प्रकल्पासाठी सल्लागार यांस देण्यात येत असलेल्या प्रचलीत दरानुसार निविदा पुर्व (Pretender Activity) कामांसाठी स्विकृत निविदा किंमतीच्या ०.८०% व निविदा पश्चात (Post Tender Activity)कामांसाठी स्विकृत निविदा किंमतीच्या १.४५% अधिक सेवाकर (Service Tax)अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४२५३ विषय क्रमांक – १०

दिनांक – ९/१०/२०१३ विभाग – मध्यवर्ती भांडार

सुचक – मा.गणेश लोंढे अनुमोदक – मा.छाया साबळे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मभां/५/कावि/७३९/२०१३दि.२७/०९/२०१३

विषय :- मनपाचे नागरीवस्ती विभागाकडील महिलांकरीता योजने अंतर्गत लाभार्थींना शिलाई मशीन खरेदी करणेबाबत..

विषय क्रमांक १० चा विचार २९/१०/२०१३ चे सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४२५४ विषय क्रमांक – ११
दिनांक – ९/१०/२०१३ विभाग – मध्यवर्ती भांडार
सुचक – मा.अरुणा भालेकर अनुमोदक – मा.सुनिता वाघेरे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मभां/७/कावि/५०७/२०१३दि.३०/०९/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे

मनपाचे विद्युत विभागासाठी बलास्ट साहित्य खरेदीकामी ई-निविदा क्र.१०/३/२०१३-१४ अन्वये लघूतम निविदाकार मे.एन.एस जैन अँन्ड कं.प्रा.लि,पुणे यांचे बलास्ट साहित्याचे दर एकुण र.रू.२२,५०,१५०/- स्विकृत करून, करारनामा करणेस व येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४२५५ विषय क्रमांक – १२
दिनांक – ९/१०/२०१३ विभाग – मध्यवर्ती भांडार
सुचक – मा.चंद्रकांत वाळके अनुमोदक – मा.आशा शेंडगे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मभां/५/कावि/७४०/२०१३दि.२७/०९/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे

मनपाचे विविध विभागांसाठी व निविदाकारांकडील Digital Signature Key व Fresh Key Supply Reneval व fresh key supply खरेदी करणेसाठी ई–निविदा क्र.३९/२/२०१२-१३ अन्वये लघूत्तम निविदाकार मे.पर्व सॉप्टवेअर प्रा.लि. मुंबई-२५, यांचे एकूण १ बाबीसाठी ई-निविदा प्रणालीचे अधिकारी व निविदाकाराकडील Digital Signature Key चे नुतनीकरण करणे साहित्याचे दर एकूण र.रु.२७,११,५००/- व मे.व्हिजन सोल्यूशन, पुणे-१६ यांचे एकूण १ बाबीसाठी मनपाचे ई-निविदा प्रणालीचे अधिकारी व निविदाकाराकडील Fresh Key Supply करणे साहित्याचे दर एकूण र.रू.१७,८६,०००/- असे एकत्रित एकूण र.रु.४४,९७,५००/- दर स्विकृत करून करारनामा करणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४२५६ विषय क्रमांक – १३
दिनांक – ९/१०/२०१३ विभाग – जलशुध्दीकरण केंद्र
सुचक – मा.अरुणा भालेकर अनुमोदक – मा.शकुंतला धराडे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.जशुके/पापु/२०४/२०१३दि.३/०९/२०१३

विषय :- जलशुध्दीकरण केंद्र सेक्टर क्र.२३ येथील विविध कामांचे वर्गीकरण करण्याबाबत..

विषय क्रमांक १३ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४२५७ विषय क्रमांक – १४
दिनांक – ९/१०/२०१३ विभाग – विद्युत मुख्य
सुचक – मा.सुनिता वाघेरे अनुमोदक – मा.विनया तापकीर
संदर्भ:- मा.सहशहर अभियंता यांचे जा.क्र.वि/मुका/४/कावि/५५३/२०१३दि.३०/०९/२०१३

मा.सहशहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे

मनपाच्या विद्युत विभागाकडील नि.नो.क्र.१७/२०१२-१३ मधील अ.क्र.१० अन्वये, अशुध्द जलउपसा केंद्र रावेत येथील पंपगृहातील टप्पा १ ते ४ डिलीव्हरी लाईन वरील व्हाल्व अकच्युएटर्सची वार्षिक पध्दतीने देखभाल दुरुस्ती करणेकामी मे.एक्सल इलेक्ट्रीकल्स (नि.र.रु.१८,२१,७१६/- (अक्षरी र.रु.अठरा लाख एकवीस

हजार सातशे सोळा) पेक्षा २.७० % कमी) या ठेकेदाराबरोबर वरील कामाचा करारनामा करुन घेणेत आलेला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४२५८ विषय क्रमांक – १५

दिनांक – ९/१०/२०१३ विभाग – विद्युत मुख्य

सुचक – मा.आशा शेंडगे अनुमोदक – मा.चंद्रकांत वाळके

संदर्भ:- मा.सहशहर अभियंता यांचे जा.क्र.वि/मुका/४/कावि/५५४/२०१३दि.३०/०९/२०१३

मा.सहशहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे

मनपाच्या विद्युत विभागाकडील नि.नो.क्र.१०/२०१२-१३ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीचे विद्युत व अग्निप्रतिबंधात्मक सुरक्षा परिक्षण करणेकामी मे.अर्थव इलेक्ट्रीक सर्व्हीसेस (नि.र.रु.७,४०,०००/- (अक्षरी र.रु.सात लाख चाळीस हजार)) या ठेकेदाराबरोबर वरील कामाचा करारनामा करुन घेणेत आलेला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४२५९ विषय क्रमांक – १६

दिनांक – ९/१०/२०१३ विभाग – उद्यान

सुचक – मा.माया बारणे अनुमोदक – मा.विनया तापकीर

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.उद्यान/४/कावि/३५२/२०१३दि.२५/०९/२०१३

विषय – मनपा हद्दीमध्ये GIS व GPS या तंत्रज्ञानाचा वापर करुन वृक्षगणनेचा पालयट प्रोजेक्ट कामकाजाबाबत..

विषय क्रमांक १६ चा विचार २९/१०/२०१३ चे सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४२६० विषय क्रमांक – १७

दिनांक – ९/१०/२०१३ विभाग – जनतासंपर्क व स्वागतकक्ष

सुचक – मा.गणेश लोंढे अनुमोदक – मा.गणेश लोंढे

संदर्भ:- मा.अति.आयुक्त यांचे जा.क्र.जसं/२/कावि/७४/२०१३दि.१/१०/२०१३

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्रकल्पांस ठाणे मनपा शिष्टमंडळ, न्यू दिल्लीचे ई-गव्हर्नन्स शिष्टमंडळ, यशदाकडील आय.ए.एस. अधिकारी शिष्टमंडळाने दिलेल्या भेटीच्या वेळी तसेच मा. जे.पी.डांगे , अध्यक्ष चौथा वित्त आयोग यांनी बैठकीकरीता व इतर मान्यवरांनी विविध कारणास्तव मनपास दिलेल्या भेटीच्या वेळी महानगरपालिकेमार्फत त्यांचे चहापान, नाष्टा, भोजन व निवास इ. व्यवस्थेकरीता एकत्रित र.रि. २९,६८०/- (अक्षरी र.रु. एकोणतीस हजार सहाशे ऐंशी फक्त) इतका खर्च झालेला आहे. या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४२६१ विषय क्रमांक – १८

दिनांक – ९/१०/२०१३ विभाग – जनतासंपर्क व स्वागतकक्ष

सुचक – मा.आशा शेंडगे अनुमोदक – मा.छाया साबळे

संदर्भ:- मा.अति.आयुक्त यांचे जा.क्र.जसं/५/कावि/४५५/२०१३दि.१/१०/२०१३

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे

महानगरपालिकेच्यावतीने जागतिक ज्येष्ठ नागरिक दिनाचे औचित्य साधून दि.७/१०/२०१३ रोजी प्रा.रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह, चिंचवड येथे शहरातील ज्येष्ठ नागरिकांकरीता कार्यक्रमाचे आयोजन करणेत आलेले आहे. त्यासाठी कार्यक्रमाचे मानधन, चहापान, नाष्टा, बॅनर, नाट्यगृहाचे भाडे इ.साठी अंदाजे र.रु. ८०,००० /- (अक्षरी र.रु.ऐंशी हजार रुपये फक्त) इतका खर्च अपेक्षित आहे. या खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४२६२ विषय क्रमांक – १९

दिनांक – ९/१०/२०१३ विभाग – बांधकाम परवानगी

सुचक – मा.शकुंतला धराडे अनुमोदक – मा.विनया तापकीर

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.बीपी/१/कावि/७५४/२०१३दि.३/१०/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे

**National Institute of Urban affairs** मार्फत JnNURM Experience Sharing, Workshop II – Learning from Cities या विषयाच्या कार्यशाळेस दि.18/9/2013 श्री.पठाण ए.ए, उपशहर अभियंता, बांधकाम परवानगी विभाग यांना तातडीने उपस्थित राहणेबाबत कळविले होते. त्यानुसार श्री.पठाण हे सदर कार्यशाळेस दि.18/9/2013 रोजी उपस्थित राहिले होते. त्यासाठी श्री. पठाण यांनी पुणे-दिल्ली-पुणे असा विमान प्रवास केलेला आहे. विमान प्रवासासाठी एकूण र.रु.17904/- (अक्षरी रक्कम रुपये सतरा हजार नऊशे चार फक्त) खर्च झालेला आहे. वरीलप्रमाणे तातडीच्या विमान प्रवासासाठी झालेल्या र.रु.17904/- खर्चाची प्रतीपूर्ती करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४२६३ विषय क्रमांक – २०

दिनांक – ९/१०/२०१३ विभाग – पाणीपुरवठा व जलनि:सारण

सुचक – मा.अरुणा भालेकर अनुमोदक – मा.चंद्रकांत वाळके

संदर्भ:- मा.सह शहर अभियंता यांचे जा.क्र.पापु/जनि/५/कावि/२२३/२०१३दि.३/१०/२०१३

मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे

मा.अंडर सेक्रेटरी (JnNURM) भारत सरकार यांचेकडील दि.०६/०९/२०१३ रोजीच्या पत्रास अनुसरुन १) यु.आर.जी.प्रकल्प २) नवीन डी.पी.आर. ३) सहा चालु प्रकल्प या संबधित कामकाजासाठी श्री.ए.व्ही.चव्हाण हे दि.१२/०९/२०१३ रोजी व दि.२६/०९/२०१३ ते २७/०९/२०१३ अखेर दिल्ली येथील "निर्माण भवन" या ठिकाणी आयोजित सभेस उपस्थित राहीले. त्यासाठी श्री.चव्हाण यांनी पुणे ते दिल्ली व दिल्ली ते पुणे दि.१२/०९/२०१३ रोजी विमान प्रवासासाठी रक्कम रु.२७,५६०/- व दि.२६/०९/२०१३, दि.२७/०९/२०१३ रोजी विमान प्रवासासाठी रक्कम रु.१८,८५९/- याप्रमाणे एकुण रक्कम ४६,४१९/- स्वत: खर्च केलेली आहे. सदरची रक्कम श्री.चव्हाण यांना अदा करणेस कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४२६४ विषय क्रमांक – २१
दिनांक – ९/१०/२०१३ विभाग – माध्यमिक शिक्षण
सुचक – मा.विनया तापकीर अनुमोदक – मा.चंद्रकांत वाळके
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.माध्य/शि/५/कावि/८०२/२०१३दि.३/१०/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे

अ कार्यालया अंतर्गत येणा-या शिक्षण मंडळ व माध्यमिक शिक्षण विभागाचे प्राथमिक व माध्यमिक विद्यालय यांचे दैनंदिन साफसफाई व स्वच्छता करणेकामी प्राप्त दरांपैकी मे.बी.एस.ए. कार्पोरेशन प्रा.लि. यांचे सर्व करांसह प्रती महिना रक्कम रुपये ५,१५,०००/- इतके लघुत्तम दर प्राप्त झाल्याने अ प्रभाग कार्यालयाचे कार्यक्षेत्रातील माध्यमिक शिक्षण विभागा अंतर्गत असलेल्या ४ माध्यमिक विद्यालये व शिक्षण मंडळाकडील ३४ प्राथमिक शाळा यांची दैनंदिन साफसफाई व स्वच्छतेकामी आवश्यक ३५ सफाई कामगार व १९ स्विपर कर्मचा-यांमार्फत करणेकामी प्रती महिना रक्कम रुपये ५,१५,०००/- प्रमाणे वार्षिक खर्च रक्कम रुपये ६१,८०,०००/- किंवा ई-निविदेतील अटी व शर्तीचे भंग केल्यास आकारावयाची दंडात्मक रक्कम वजा जाता येणा-या प्रत्यक्ष खर्चास तसेच संबंधितांबरोबर १ वर्षाचा करारनामा करुन कामाचा आदेश देणेस, तसेच संबंधितांकडून समाधानकारकपणे काम झाल्यास पुढील एक वर्षाकरीता मा.आयुक्त व मा. स्थायी समिती यांचे मान्यतेने करारनामा (याप्रमाणे एकूण ०३ वर्षे) करुन कामाचा आदेश देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४२६५ विषय क्रमांक – २२
दिनांक – ९/१०/२०१३ विभाग – वैद्यकिय मुख्य
सुचक – मा.माया बारणे अनुमोदक – मा.आशा शेंडगे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.वैद्य/१अ/कावि/१०११/२०१३दि.३/१०/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे

वायसीएम रुग्णालयामधील प्रस्तावात नमूद ३ पदांवरील वैद्यकीय अधिकारी यांना तीन शिफ्टमध्ये कामकाज करावे लागते. तसेच वायसीएम रुग्णालयातील तातडीक कक्षातील कामकाजाचा व्याप लक्षात घेता सदरचे रजा राखीव वैद्यकीय अधिका-यांची ३ पदे रजा राखीव वैद्यकीय अधिकारी या ऐवजी सी एम ओ म्हणुन हंगामी पध्दतीने दरमहा एकत्रित मानधनावर ६ महिनेचे कालावधीसाठी भरणेस व त्यासाठी वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन **Walk In Interview** पध्दतीने मुलाखती घेऊन भरणेस व त्यांना दरमहा र.रु. ४५०००/- एकत्रित मानधन अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४२६६ विषय क्रमांक – २३
दिनांक – ९/१०/२०१३ विभाग – माध्यमिक शिक्षण
सुचक – मा.गणेश लोंढे अनुमोदक – मा.छाया साबळे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.माध्य/शि/५/कावि/८०३/२०१३दि.३/१०/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे

ब प्रभाग कार्यालया अंतर्गत येणा-या शिक्षण मंडळ व माध्यमिक शिक्षण विभागाचे प्राथमिक व माध्यमिक विद्यालय यांचे दैनंदिन साफसफाई व स्वच्छता करणेकामी प्राप्त दरांपैकी मे.बी.एस.ए. कार्पोरेशन प्रा.लि. यांचे सर्व करांसह प्रती महिना रक्कम रुपये ४,४८,७१५/- इतके लघुत्तम दर प्राप्त झाल्याने ब प्रभाग कार्यालयाचे कार्यक्षेत्रातील माध्यमिक शिक्षण विभागा अंतर्गत असलेल्या ५ माध्यमिक विद्यालये व १ क्रिडा प्रबोधिनी मुलांचे वसतीगृह व शिक्षण मंडळाकडील २८ प्राथमिक शाळा यांची दैनंदिन साफसफाई व

स्वच्छतेकामी आवश्यक २७ सफाई कामगार व २० स्विपर कर्मचा-यांमार्फत करणेकामी प्रती महिना रक्कम रुपये ४,४८,७१५/- प्रमाणे वार्षिक खर्च रक्कम रुपये ५३,८४,५८०/-किंवा ई-निविदेतील अटी व शर्तींचे भंग केल्यास आकारावयाची दंडात्मक रक्कम वजा जाता येणा-या प्रत्यक्ष खर्चास तसेच संबंधितांबरोबर 1 वर्षाचा करारनामा करुन कामाचा आदेश देणेकामी, तसेच संबंधितांकडून समाधानकारकपणे काम झाल्यास पुढील एक वर्षाकरीता मा. आयुक्त व मा. स्थायी समिती यांचे मान्यतेने करारनामा (याप्रमाणे एकूण ०३ वर्षे) करुन कामाचा आदेश देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४२६७ विषय क्रमांक – २४
दिनांक – ९/१०/२०१३ विभाग – माध्यमिक शिक्षण
सुचक – मा.विनया तापकीर अनुमोदक – मा.चंद्रकांत वाळके
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.माध्य/शि/५/कावि/८०४/२०१३दि.३/१०/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे

क कार्यालया अंतर्गत येणा-या शिक्षण मंडळ व माध्यमिक शिक्षण विभागाचे प्राथमिक व माध्यमिक विद्यालय यांचे दैनंदिन साफसफाई व स्वच्छता करणेकामी मे.डी.एम.एंटरप्रायझेस यांचे सर्व करांसह प्रती महिना रक्कम रुपये ५,१५,०००/- इतके लघुत्तम दर प्राप्त झाल्याने क प्रभाग कार्यालयाचे कार्यक्षेत्रातील माध्यमिक शिक्षण विभागा अंतर्गत असलेल्या ५ माध्यमिक विद्यालये व शिक्षण मंडळाकडील ४२ प्राथमिक शाळा यांची दैनंदिन साफसफाई व स्वच्छतेकामी आवश्यक ३७ सफाई कामगार व १७ स्विपर कर्मचा-यांमार्फत करणेकामी प्रती महिना रक्कम रुपये ५,१५,०००/- प्रमाणे वार्षिक खर्च रक्कम रुपये ६१,८०,०००/- किंवा ई-निविदेतील अटी व शर्तींचे भंग केल्यास आकारावयाची दंडात्मक रक्कम वजा जाता येणा-या प्रत्यक्ष खर्चास तसेच संबंधितांबरोबर १ वर्षाचा करारनामा करुन कामाचा आदेश देणेकामी, तसेच संबंधितांकडून समाधानकारकपणे काम झाल्यास पुढील एक वर्षाकरीता मा. आयुक्त व मा. स्थायी समिती यांचे मान्यतेने करारनामा (याप्रमाणे एकूण ०३ वर्षे) करुन कामाचा आदेश देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४२६८ विषय क्रमांक – २५
दिनांक – ९/१०/२०१३ विभाग – माध्यमिक शिक्षण
सुचक – मा.अरुणा भालेकर अनुमोदक – मा.छाया साबळे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.माध्य/शि/५/कावि/८०५/२०१३दि.३/१०/२०१३

विषय – अ कार्यालया अंतर्गत येणा-या शिक्षण मंडळ व माध्यमिक शाळा परिसर सुरक्षेबाबत..

विषय क्रमांक २५ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४२६९ विषय क्रमांक – २६
दिनांक – ९/१०/२०१३ विभाग – माध्यमिक शिक्षण
सुचक – मा.माया बारणे अनुमोदक – मा.विनया तापकीर
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.माध्य/शि/५/कावि/८०६/२०१३दि.३/१०/२०१३

विषय :- प्राथमिक व माध्यमिक शाळा परिसर सुरक्षेबाबत..

विषय क्रमांक २६ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४२७० विषय क्रमांक – २७

दिनांक – ९/१०/२०१३

सुचक – मा.आशा शेंडगे अनुमोदक – मा.शकुंतला धराडे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.क्रीडा/७/कावि/९१९/२०१३दि.२४/०९/२०१३

विषय :- मनपा ३१ वा वर्धापनदिन २०१३ अनुषंगाने स्पर्धांबाबत..

विषय क्रमांक २७ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४२७१ विषय क्रमांक – २८

दिनांक – ९/१०/२०१३ विभाग – नगररचना व विकास

सुचक – मा.विनया तापकीर अनुमोदक – मा.छाया साबळे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.नरवि/कावि/पिंपळेगुरव/टे-८/३६२/२०१३दि.४/१०/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे

मौजे पिंपळेगुरव ग्रेथील स.नं.८४ व ८५ पैकी मंजुर विकास योजनेतील ४५.०० मी. रस्त्याचे भूसंपादनाचे काम विशेष भुमी संपादन अधिकारी, विशेष घटक क्र.१, पिंपरी यांचे मार्फत चालू आहे. सदरचे प्रकरणी जागा मालकांना प्रपत्र अ द्वारे आगाऊ ताबा देणेबाबत महापालिकेकडून विनंती करण्यात आली होती. त्यानुसार संबंधितांनी सुमारे वर्षभरापूर्वी प्रपत्र ब द्वारे आगाऊ ताबा महानगरपालिकेस दिला असून त्यानुसार खाजगी वाटाघाटीनुसार मोबदला मिळण्याच्या अटीवर ताबा महानगरपालिकेस दिलेला आहे. सदर जागेवर महानगरपालिकेने रस्त्याचे काम केलेले असून सदर रस्त्याने बाधीत क्षेत्रासाठी मोबदला मिळणेबाबत मा.नगरसदस्य पाठपुरावा करीत आहे. सदर रस्त्याने बाधित मिळकतधारक यांना नगरभूमापन कार्यालयाकडील मोजणी फी चा खर्च सर्वसामान्य नागरीकांना करणे शक्य नाही. तरी नगररचना विभागाने केलेल्या मोजणीच्या आधारे सध्याचा ७/१२ उतारा ग्राह्य धरून व मोजणीची अट रद्द करून मोबदला देण्यात यावा. अशी मागणी संबंधीत बाधीत जागा मालकांनी केलेली आहे. परंतू सदर रस्त्याचे भूसंपादन प्रकरणी झालेल्या संयुक्त मोजणी नकाशावरून जागा मालकाची वहीवाट निश्चित होत नाही. त्यामुळे अर्जदाराचे वहिवाटीचे मोजणी नकाशाचे अभावी फक्त संयुक्त मोजणी नकाशाच्या आधारे मोबदला अदा करणेस अडचण निर्माण होत आहे. सदर रस्त्याने बाधीत मिळकतीचे एकूण क्षेत्र कमी असल्याने मिळकतधारकास त्याची शासकीय मोजणी फी परवडणारी नाही. सदरच्या शासकीय मोजणी करण्यास जास्त कालावधी लागत असल्याने तसेच महानगरपालिकेकडील बी.आर.टी. व जे.एन.एन.यु.आर.एम. प्रकल्पाचे अंतर्गत सदरचा रस्ता समाविष्ट असल्याने तो कालमर्यादेत कार्यान्वित करणेकरिता सदरचे धोरण आवश्यक आहे. या प्रकरणी मा.आयुक्त सो. यांचे समवेत दि.०७/०३/२०१३ रोजी झालेली चर्चा व मा.जमाबंदी आयुक्त यांचे समवेत दि.११/०३/२०१३ रोजी झालेल्या चर्चेमध्ये सदर संयुक्त मोजणी नकाशावर मनपाच्या सर्व्हेअरकडून बाधीत मिळकतधारकांच्या वहिवाटी दर्शवून ती वहिवाट ग्राह्य धरुन नुकसान भरपाई रक्कम अदा करण्यास काहीही हरकत नसल्याचे सुचित करण्यात आले आहे. कोणत्याही मिळकतधारकास शासकीय कार्यालयाकडील मोजणी नकाशा सादर केल्याशिवाय त्याची मालकी हक्क सिध्द होत नाही व ज्या प्रकरणी संयुक्त मोजणी झालेली आहे. त्या प्रकरणी संयुक्त मोजणी नकाशात दर्शविल्यानुसार सी.टी.सर्व्हेच्या हद्दी, बांधकामे, सिमाभिंती, तार कुंपन, झाडे, रस्ते, इलेक्ट्रीक खांब इत्यादीच्या आधारे रस्त्याचे रूंदीने बाधीत क्षेत्र सदर मालकाने दर्शविलेले वहिवाटीचे क्षेत्र व ७/१२ उता-यामधील सदर जागा मालकांचे क्षेत्र यांचा ताळमेळ दर्शवून येणा-या वहिवाटीच्या मोजणी नकाशानुसार बाधीत क्षेत्र महानगरपालिकेच्या सर्व्हेअरने निश्चित करून त्याप्रमाणे मोजणी नकाशा तयार करून व त्यानुसार येणा-या बाधित क्षेत्रानुसार खाजगी वाटाघाटीने नुकसान भरपाई रक्कम अदा करणे शक्य आहे. सदर कामी खालील नमुद केलेनुसार कार्यपध्दती व आवश्यक कागदपत्रे सादर करणे बंधनकारक राहिल. १) संयुक्त मोजणी नकाशानुसार तयार करावयाचे मोजणी

नकाशावर मिळकतधारकाची वहिवाट मंजूर असल्याबाबत चतु:सिमेच्या जागा मालकांच्या स्वाक्षरी घेणे, २) सदर चतु:सिमेच्या जागा मालकांना हजर करण्याची जबाबदारी ही मिळकत धारकांची राहील, ३) र.रु.२००/- चे स्टॅम्प पेपरवर साक्षांकित प्रतिज्ञापत्र व बंधनपत्र मिळकतधारकाकडून करुन घेणे, ४) सदर प्रतिज्ञापत्र व बंधनपत्राचा मसुदा मा.कायदा सल्लागार यांचेकडून तपासून घेणे, ५) ज्या मिळकतधारकांच्या मिळकती पुर्णतः मंजूर विकास योजनेतील प्रस्तावाने बाधीत होत असल्यास ७/१२ उता-यावर असणारे क्षेत्र किंवा वहिवाटीने दर्शविणेत आलेले क्षेत्र यापैकी जे कमी असेल त्याप्रमाणे मोबदला देणे, ६) सदर प्रतिज्ञापत्रात प्रामुख्याने मनपाने केलेल्या संयुक्त मोजणी नकाशात दर्शविलेले क्षेत्र संबंधित मिळकतधारकास मान्य करावे लागेल व याबाबत न्यायालयात दाद मागता येणार नाही असे नमुद करुन घ्यावे लागेल. म.प्रा. व न.र.अधि. १९६६ चे कलम १२६(१)(अ) नुसार खाजगी वाटाघाटीने भूसंपादनाचा पर्याय उपलब्ध आहे. तथापि म.प्रा. व न.र.अधि.१९६६ चे कलम १५२ नुसार सदर कलमाचे अधिकार हे Planning Authority कडे असलेने सदर बाब धोरणात्मक निर्णयासाठी मा.स्थायी समिती मार्फत मा.महापालिका सभेपुढे मंजूरीसाठी पाठविणे आवश्यक आहे. तथापि यापुढे प्रत्येक प्रकरणासाठी, आर्थिक बाबीसाठी मा.स्थायी समितीची मंजूरी घेणे आवश्यक राहील. भविष्यात जे.एन.एन.यु.आर.एम. अंतर्गत विकसीत होणारे रस्ते व इतर आवश्यक रस्त्याकरीता देखील अशाच पध्दतीने खाजगी वाटाघाटीने नुकसान भरपाई अदा करण्याची मागणी नागरीक/नगरसदस्य यांच्यामार्फत होऊ शकते. सबब प्रस्तावात नमुद केलेनुसार ज्या प्रकरणी रस्त्याचा भूसंपादन प्रस्ताव पाठविलेला आहे व संयुक्त मोजणी पुर्ण झालेली आहे. अशा रस्त्याकरीता बाधीत जागेचा खाजगी वाटाघाटीने मोबदला अदा करणेकामी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे धोरणात्मक बार्बीस व कार्यपध्दतीस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**<u>सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.</u>**

ठराव क्रमांक – ४२७२ | विषय क्रमांक – २९

दिनांक – ९/१०/२०१३ | विभाग – नगररचना व विकास

सुचक – मा.गणेश लोंढे | अनुमोदक – मा.अरुणा भालेकर

संदर्भ:- मा.गणेश लोंढे,मा.अरुणा भालेकर यांचा प्रस्ताव..

मा.स्थायी समिती ठराव क्र.३६७७ दिनांक ९/७/२०१३ मध्ये करारनामा करण्यास या मजकुरानंतर मा.महापालिका सभेकडे शिफारस करण्यात येत आहे हा मजकुर समाविष्ट करण्यात यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४२७३ | विषय क्रमांक – ३०

दिनांक – ९/१०/२०१३ | विभाग – क प्रभाग पाणीपुरवठा

सुचक – मा.माया बारणे | अनुमोदक – मा.सुनिता वाघेरे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.कप्र/पापु/११/कावि/१२९५/२०१३, दि.०८/१०/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेऊन -

भोसरी उपविभागातील क प्रभागातील टाक्यांवरुन वितरण व्यवस्था करणेकामी बचतीमधुन तरतुद र.रु. ५०,००,०००/- सोबतचे प्रपत्राप्रमाणे वर्ग करणेचा व सदरचे काम मार्च पर्यंत करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४२७४ विषय क्रमांक – ३१

दिनांक – ९/१०/२०१३ विभाग – प्रशासन

सुचक – मा.अरुणा भालेकर अनुमोदक – मा.छाया साबळे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.प्रशा/०५/कावि/९६९/२०१३दि.५/१०/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे

रखवालदार पदासाठी प्राप्त झालेल्या १४,९०६ अर्जाची माहिती संगणकावर नोंदविण्याचे काम मे.झील टेक सर्व्हीसेस कोथरुड पुणे यांचेकडुन प्रति अर्ज ५ रु. ५० पैसे प्रमाणे रक्कम रुपये ८१,९८३/- व उर्वरित पदासाठी २८,५०७/- अर्जाची संगणकावर माहिती नोंदविण्याचे काम ३ रुपये ५० पैसे दरा प्रमाणे रक्कम रुपये ९९,७७४/- अशा एकुण रक्कम रुपये १,८१,७५७/- सर्व्हिस टॅक्स + व्हॅट या प्रमाणे थेट पध्दतीने निविदा न मागविता व करारनामा न करता करुन घेण्यास व येणा-या प्रत्यक्ष खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ५ मधील संविदा कलम २(२) चे परंतुका नुसार मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४२७५ विषय क्रमांक – ३२

दिनांक – ९/१०/२०१३ विभाग – विद्युत उद्यान

सुचक – मा.विनया तापकीर अनुमोदक – मा.गणेश लोंढे

संदर्भ:- मा.सह शहर अभियंता यांचे जा.क्र.वि३/टीर/१०/२०१३दि.७/१०/२०१३

मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे

वॉर्ड क्र.३४ मधील आरक्षण ४१४ भोसरी येथील विकसीत होणा-या उद्यानाकरीता स्वतंत्र वीज कनेक्शनद्वारे वीज पुरवठा करणे आवश्यक आहे. त्या करीता मराविवि कंपनीकडे अर्ज सादर केला असता, र.रु.१२५२०/- इतक्या रक्कमेचे कोटेशन प्राप्त झालेले आहे. सदरचे शुल्क र.रु. १२५००/-(रु.बारा हजार पाचशे फक्त) मराविवि कंपनीस अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४२७६ विषय क्रमांक – ३३

दिनांक – ९/१०/२०१३ विभाग – सार्वजनिक वाचनालय

सुचक – मा.माया बारणे अनुमोदक – मा.सुनिता वाघेरे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.सावा/२/कावि/२०२/२०१३दि.३०/०९/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सार्वजनिक वाचनालय विभागामार्फत चालविल्या जाणा-या १६ सार्वजनिक वाचनालयांपैकी महात्मा जोतिबा फुले सार्वजनिक वाचनालय तानाजीनगर चिंचवड हे महात्मा जोतिबा फुले मंडळ चिंचवड यांना अटी व शर्तीनुसार करारनामा करुन दि.२०/६/२०१३ ते १९/९/२०१३ अखेर चालविण्यास देण्यात आले आहे. महात्मा जोतिबा फुले सार्वजनिक वाचनालय निविदा प्रक्रिया राबवुन नवीन खाजगी संस्थेस चालविण्यास देण्यास काही कालावधी लागणार असलेने दि.२०/९/२०१३ ते १९/११/२०१३ पर्यंत महात्मा ज्योतिबा फुले मंडळास करारनामा न करता व यापुर्वी केलेल्या करारनाम्याचे अटी व शर्तीस अधीन राहून दोन महिने कालावधीकरीता मुदतवाढ देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४२७७ विषय क्रमांक – ३४

दिनांक – ९/१०/२०१३

सुचक – मा.अविनाश टेकावडे अनुमोदक – मा.शकुंतला धराडे

संदर्भ:- मा.अविनाश टेकावडे,मा.शकुंतला धराडे यांचा प्रस्ताव.

प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे मनपाचे सन २०१३ – १४ च्या अंदाजपत्रकात वाढ घट करणेस मान्यता देणेत येत आहे. ( वाढ/घट र.रु.८.५० लाख)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४२७८ विषय क्रमांक – ३५

दिनांक – ९/१०/२०१३

सुचक – मा.अविनाश टेकावडे अनुमोदक – मा.शकुंतला धराडे

संदर्भ:- मा.अविनाश टेकावडे,मा.शकुंतला धराडे यांचा प्रस्ताव.

ब प्रभागामध्ये सन २०१३ – १४ च्या अंदाजपत्रकामध्ये कामांच्या प्रस्तावात नमुद प्रमाणे तरतुदीमध्ये फेरबदल करणेस मान्यता देणेत येत आहे. ( वाढ/घट र.रु.१०,५०,००० )

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४२७९ विषय क्रमांक – ३६

दिनांक – ९/१०/२०१३

सुचक – मा.अविनाश टेकावडे अनुमोदक – मा.शकुंतला धराडे

संदर्भ:- मा.अविनाश टेकावडे,मा.शकुंतला धराडे यांचा प्रस्ताव.

ड प्रभाग व ड मुख्यालयामध्ये सन २०१३ – १४ च्या अंदाजपत्रकामध्ये कामांच्या प्रस्तावात नमुद प्रमाणे तरतुदीमध्ये फेरबदल करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.२३,१०,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४२८० विषय क्रमांक – ३७

दिनांक – ९/१०/२०१३ विभाग – स्थापत्य

सुचक – मा.अविनाश टेकावडे अनुमोदक – मा.शकुंतला धराडे

संदर्भ:- मा.अविनाश टेकावडे,मा.शकुंतला धराडे यांचा प्रस्ताव.

महानगरपालिकेच्या सन २०१३ – १४ चे अंदाजपत्रकामध्ये ड प्रभागमधील कामासाठी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे तरतुद वर्गीकरण करण्यास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी. (वाढ/घट र.रु.१,४२,५०,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४२८१ विषय क्रमांक – ३८

दिनांक – ९/१०/२०१३ विभाग – स्थापत्य

सुचक – मा.अविनाश टेकावडे अनुमोदक – मा.शकुंतला धराडे

संदर्भ:- मा.अविनाश टेकावडे,मा.शकुंतला धराडे यांचा प्रस्ताव.

ब प्रभागामध्ये सन २०१३ – १४ च्या अंदाजपत्रकामध्ये प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कामांच्या तरतुदीमध्ये फेरबदल करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.३५,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४२८२ विषय क्रमांक – ३९

दिनांक – ९/१०/२०१३

सुचक – मा.अविनाश टेकावडे अनुमोदक – मा.शकुंतला धराडे

संदर्भ:- मा.अविनाश टेकावडे,मा.शकुंतला धराडे यांचा प्रस्ताव.

ब प्रभागामध्ये सन २०१३ – १४ च्या अंदाजपत्रकामध्ये प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कामांच्या तरतुदीमध्ये फेरबदल करणेस मान्यता देणेत येत आहे. ( वाढ/घट र.रु.१०,६०,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४२८३ विषय क्रमांक – ४०

दिनांक – ९/१०/२०१३

सुचक – मा.अविनाश टेकावडे अनुमोदक – मा.शकुंतला धराडे

संदर्भ:- मा.अविनाश टेकावडे,मा.शकुंतला धराडे यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०१३ – १४ या आर्थिक वर्षामध्ये प्रस्तावात नमुद प्रमाणे तरतुद वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.२,५०,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४२८४ विषय क्रमांक – ४१

दिनांक – ९/१०/२०१३

सुचक – मा.अविनाश टेकावडे अनुमोदक – मा.शकुंतला धराडे

संदर्भ:- मा.अविनाश टेकावडे,मा.शकुंतला धराडे यांचा प्रस्ताव.

ब प्रभागामध्ये सन २०१३ – १४ च्या अंदाजपत्रकामध्ये कामांच्या तरतुदीमध्ये प्रस्तावात नमुदप्रमाणे फेरबदल करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु. ६,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४२८५ विषय क्रमांक – ४२

दिनांक – ९/१०/२०१३

सुचक – मा.अविनाश टेकावडे अनुमोदक – मा.शकुंतला धराडे

संदर्भ:- मा.अविनाश टेकावडे,मा.शकुंतला धराडे यांचा प्रस्ताव.

अ प्रभाग स्थापत्य विभागाकडील सन २०१३ – १४ च्या अंदाजपत्रकातील अ प्रभाग स्थापत्य विभागाकडील एकुण १ कामाला कमी तरतुद असलेमुळे या कामांची देयके अदा करता येत नाही. तरी सन २०१३ – १४ च्या मुळ अंदाजपत्रकातील अशा कमी तरतुद असलेल्या कामांस रक्कम रु.१९,२०,०००/- एवढी रक्कम याच प्रभागातील जास्त तरतुद असलेल्या तसेच नवीन कामांमध्ये होणा-या बचती मधुन सोबत जोडलेल्या यादीप्रमाणे तरतुद वर्ग करणे आवश्यक आहे. अ प्रभागातील सन २०१३ – १४ च्या मुळ अंदाजपत्रकातील स्थापत्य विषयक विकास कामांच्या तरतुदीमध्ये वाढ घट करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४२८६ विषय क्रमांक – ४३
दिनांक – ९/१०/२०१३
सुचक – मा.अविनाश टेकावडे अनुमोदक – मा.शकुंतला धराडे
संदर्भ:- मा.अविनाश टेकावडे,मा.शकुंतला धराडे यांचा प्रस्ताव.

अ प्रभागातील तरतुदींमध्ये प्रस्तावात नमुद प्रमाणे वाढ घट करणेस मान्यता देणेत येत आहे.(वाढ घट र.रु. १९,२०,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४२८७ विषय क्रमांक – ४४
दिनांक – ९/१०/२०१३
सुचक – मा.अविनाश टेकावडे अनुमोदक – मा.शकुंतला धराडे
संदर्भ:- मा.अविनाश टेकावडे, मा.शकुंतला धराडे यांचा प्रस्ताव.

मा.स्थायी समिती सभा कार्यपत्रिका क्र. ८० ठराव क्र.४२१८ दिनांक ०१/१०/२०१३ यामध्ये नागरिक व विद्यार्थी खेळाडू यांचे सोईचे दृष्टीने जास्तीत जास्त सराव करता यावा म्हणून म.न.पा.चे लॉन टेनिस कोर्ट, स्क्वेॅर्श् कोर्ट व बॅडमिंटन हॉल या क्रीडा सुविधाची साप्तहिक सुटटी रविवार ऐवजी दर शुक्रवार या दिवशी दिनांक ०१ ऑक्टोबर २०१३ ऐवजी दिनांक ०१ जानेवारी २०१४ अशी दुरुस्ती करण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४२८८ विषय क्रमांक – ४५
दिनांक – ९/१०/२०१३
सुचक – मा.शकुंतला धराडे अनुमोदक – मा.अरुणा भालेकर
संदर्भ:- मा.शकुंतला धराडे मा.अरुणा भालेकर यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आय.टी.आय.मार्फत एम.एस.सी.आय.टी.संगणक प्रशिक्षण, महिला-मुली, मागासवर्गीय व्यक्तींसाठी, अपंग यांना वेगवेगळया प्रभागांमध्ये महानगरपालिकेचे केंद्र सुरु करुन देण्यात येत आहे. एम.एस.सी.आय.टी.संगणक प्रशिक्षणाचा जास्तीत जास्त फायदा महिला-मुली, मागासवर्गीय व्यक्तींना होण्याच्या दृष्टीने मे.नालंदा कॉम्प्युटर सेंटर, पिंपरी ही संस्था गेली २० वर्षापासून या क्षेत्रात काम करीत असून संस्थेकडे प्रशिक्षीत शिक्षक, भव्य लॅब, २० अद्ययावत संगणक आहेत. संस्थेचा २० वर्षाचा अनुभव विचारात घेऊन महिला व बालकल्याण योजना, मागसवर्गीय कल्याणकारी योजेनेअंतर्गत एम.एस.सी.आय.टी.संगणक प्रशिक्षण देणकामी मे. नालंदा कॉम्प्युटर सेंटर, पिंपरी यांची नेमणूक होण्यास व त्याकरिता येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यात देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४२८९ विषय क्रमांक – ४६
दिनांक – ९/१०/२०१३
सुचक – मा.अविनाश टेकावडे अनुमोदक – मा.अरुणा भालेकर
संदर्भ:- मा.अविनाश टेकावडे, मा.अरुणा भालेकर यांचा प्रस्ताव.

ब प्रभागातील सन २०१३-१४ च्या मुळ अंदाजपत्रकातील स्थापत्य विकास कामांच्या तरतुदीमध्ये प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे वाढ घट करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.८०००००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४२९० विषय क्रमांक – ४७

दिनांक – ९/१०/२०१३

सुचक – मा.अरुणा भालेकर अनुमोदक – मा.छाया साबळे

संदर्भ:- मा. अरुणा भालेकर, मा.छाया साबळे यांचा प्रस्ताव.

ब प्रभागामध्ये सन २०१३-१४ च्या अंदाजपत्रकामध्ये कामांच्या तरतुदींमध्ये प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे फेरबदल करणेस मान्यता देणेत येत आहे.. (वाढ/घट र.रु.६६९००००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४२९१ विषय क्रमांक – ४८

दिनांक – ९/१०/२०१३

सुचक – मा.सुनिता वाघेरे अनुमोदक – मा.शकुंतला धराडे

संदर्भ:- मा. सुनिता वाघेरे, मा.शकुंतला धराडे यांचा प्रस्ताव.

झोनिपू स्थापत्य विभागातील सन २०१३-१४ ची तरतूद प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे वाढ/घट करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.११.००/- लाख)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४२९२ विषय क्रमांक – ४९

दिनांक – ९/१०/२०१३

सुचक – मा.अविनाश टेकावडे अनुमोदक – मा.शकुंतला धराडे

संदर्भ:- मा. अविनाश टेकावडे, मा.शकुंतला धराडे यांचा प्रस्ताव.

ब प्रभागातील सन २०१३-१४ च्या मूळ अंदाजपत्रकातील स्थापत्य विकास कामांच्या तरतूदीमध्ये प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे वाढ/घट करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.१,६०,८९,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४२९३ विषय क्रमांक – ५०

दिनांक – ९/१०/२०१३

सुचक – मा.विनया तापकीर अनुमोदक – मा.छाया साबळे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.वि/बप्र/७१/२०१३ दि.३/१०/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे

विद्युत मुख्यालयाअंतर्गत ब प्रभाग, मु.पु.रस्ता, वायसीएमएच व आचार्य अत्रे रंगमंदीर इ-लेखाशिर्षावरील विद्युत विषयक भांडवली विकास व देखभाल दुरुस्तीच्या पुर्ण चालू निविदा मागविणेत आलेल्या व नवीन कामाकरिता तरतूद पुरेशी नसल्याने प्रस्तावात नमूद केलेल्या तक्त्यातील कामांना पुरेशी तरतूद करणे आवश्यक आहे. सदरच्या कामांसाठी तरतूद वर्गीकरणास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४२९४ विषय क्रमांक – ५१

दिनांक – ९/१०/२०१३

सुचक – मा.अविनाश टेकावडे अनुमोदक – मा.शकुंतला धराडे

संदर्भ:- मा.अविनाश टेकावडे, मा.शकुंतला धराडे यांचा प्रस्ताव.

अ प्रभाग स्थापत्य विभागाकडील सन २०१३-१४ च्या अंदाजपत्रकातील अ प्रभाग स्थापत्य विभागाकडील एकूण ०१ कामांना कमी तरतूद असलेमुळे या कामांची देयके अदा करता येत नाही. तरी सन

२०१३-१४ च्या मूळ अंदाजपत्रकातील अशा कमी तरतूद असलेल्या कामांस रक्कम रु. ९५,००,०००/- एवढी रक्कम याच प्रभागातील जास्त तरतूद असलेल्या तसेच नवीन कामांमध्ये होणा-या बचती मधून प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे तरतूद वर्ग करण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४२९५ विषय क्रमांक – ५२

दिनांक – ९/१०/२०१३

सुचक – मा.अविनाश टेकावडे अनुमोदक – मा.शकुंतला धराडे

संदर्भ:- मा.अविनाश टेकावडे, मा.शकुंतला धराडे यांचा प्रस्ताव.

मा.स्थायी समिती सभा कार्यंपत्रिका क्र.८० ठराव क्रमांक ४२१७ दिनांक ०१/१०/२०१३ यामध्ये १) वैदुवस्ती व्यायामशाळा पिंपळेगुरव २) बळवंत चिंचवडे व्यायामशाळा चिंचवड व ३) मुंजाबा चौक पिंपळे सौदागर या व्यायामशाळा वगळता याऐवजी " १) वैदुवस्ती व्यायामशाळा पिंपळे गुरव २) बळवंत चिंचवडे व्यायामशाळा चिंचवड व ३) मुंजाबा चौक पिंपळे सौदागर" या व्यायामशाळांसह प्रस्तावात नमूद उर्वरीत २८ व्यायामशाळांसह एकूण ३१ व्यायामशाळांना अशी दुरुस्ती करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४२९६ विषय क्रमांक – ५३

दिनांक – ९/१०/२०१३

सुचक – मा.गणेश लोंढे अनुमोदक – मा.सुनिता वाघेरे

संदर्भ:- मा.गणेश लोंढे मा.सुनिता वाघेरे यांचा प्रस्ताव.

"ChangeManagement for achieving continuous water supply for all in Urban Areas" दिनांक – १७ ते २६ ऑक्टोबर २०१३ या कालावधीत ASCI द्वारा आयोजित आंतरराष्ट्रीय प्रशिक्षण कार्यक्रमास अनुसरुन दिनांक १७/१०/२०१३ ते २६/१०/२०१३ या कालावधीत ASCI द्वारा आयोजित हैद्राबाद व इस्त्रायल या देशातील जेरुसलेम व तल अविव या शहरात म.न.पा. मार्फत मा.पदाधिकारी व अधिकारी यांची निवड करण्यात आली आहे. सदर दौ-यांसाठी मा.स्थायी समिती सदस्य श्री.महेश किसनराव लांडगे व श्री.समीर मोरश्वर मासुळकर यांचेकरीता प्रशिक्षणासाठी लागणारे प्रती व्यक्ती शुल्क रक्कम रु. २,२५,०००/- अधिक १२.३६% सेवाकर (एकूण र.रु.५,०५,६२०/-) इतकी रक्कम लागणार आहे. तरी सदरची रक्कम रु.५,००,०००/- नगरसचिव कार्यालयाकडील " स्थायी आस्थापना सभा शाखा" (अंदाजपत्रक सन २०१३-१३ पान क्र. १३४, अनु.क्र.१) या लेखाशिर्षामधून "सन्मा.नगरसदस्यांच्या अभ्यास दौ-यांकरिता व प्रशिक्षणाकरीता" (अंदाजपत्रक सन २ञ१३-१४ पान क्र.५०,अनु.क्र.२४) या लेखाशिर्षावर वर्ग करणेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४२९७ विषय क्रमांक – ५४

दिनांक – ९/१०/२०१३

सुचक – मा.अविनाश टेकावडे अनुमोदक – मा.शकुंतला धराडे

संदर्भ:- मा.अविनाश टेकावडे, मा.शकुंतला धराडे यांचा प्रस्ताव.

मा.स्थायी समिती ठराव क्र. ४२२० दिनांक १/१०/२०१३ रदद करण्यात यावा व क्रीडा समिती सभा दिनांक १९/९/२०१३ ठराव क्र. ३७ नुसार विषय मंजूर करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४२९८ विषय क्रमांक – ५५
दिनांक – ९/१०/२०१३
सुचक – मा.अविनाश टेकावडे अनुमोदक – मा.शकुंतला धराडे
संदर्भ:- मा.अविनाश टेकावडे, मा.शकुंतला धराडे यांचा प्रस्ताव.

”ड” प्रभाग व ”ड” मुख्यालयामध्ये सन २०१३ -१४ च्या अंदाजमध्ये कामाच्या तरतुदीमध्ये प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे फेर बदल करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट ३१,००,०००)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४२९९ विषय क्रमांक – ५६
दिनांक – ९/१०/२०१३
सुचक – मा.शकुंतला धराडे अनुमोदक – मा.अरुणा भालेकर
संदर्भ:- मा.शकुंतला धराडे, मा.अरुणा भालेकर यांचा प्रस्ताव.

महर्षी वाल्मिकी जयंती दिनांक १८/१०/२०१३ रोजी येत असून महापालिकेच्या माध्यमातून खर्च केला जातो. या वर्षी महागाई व कार्यक्रम पाहाता र.रु. १,२०,०००/- ऐवजी ८० हजार रुपये वाढवून र.रु.२,००,०००/- करण्यास मंजूरी देण्यात येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४३०० विषय क्रमांक – ५७
दिनांक – ९/१०/२०१३
सुचक – मा.गणेश लोंढे अनुमोदक – मा.सुनिता वाघेरे
संदर्भ:- मा.गणेश लोंढे, मा.सुनिता वाघेरे यांचा प्रस्ताव.

मा.स्थायी समिती सभा कार्यपत्रिका क्रमांक ८० ठराव क्र. ४२४२ दिनांक १/१०/२०१३ मध्ये ठराव क्र. ४१० या मजकुरा ऐवजी ठराव क्रमांक ४१०१ तसेच (वाढ/घट र.रु. २३ लाख) ऐवजी (वाढ/घट र.रु.९३ लाख) हा मजकूर समाविष्ट करणेची दुरुस्ती करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४३०१ विषय क्रमांक – ५८
दिनांक – ९/१०/२०१३
सुचक – मा.सुनिता वाघेरे अनुमोदक – मा.शकुंतला धराडे
संदर्भ:- मा. सुनिता वाघेरे, मा.शकुंतला धराडे यांचा प्रस्ताव.

”ड” प्रभाग व ”ड” मुख्यालयामध्ये सन २०१३ -१४ च्या अंदाजमध्ये कामाच्या तरतुदीमध्ये प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे फेर बदल करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट ५२४५०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४३०२ विषय क्रमांक – ५९
दिनांक – ९/१०/२०१३ विभाग – जनतासंपर्क व स्वागत कक्ष
सुचक – मा.गणेश लोंढे अनुमोदक – मा.सुनिता वाघेरे
संदर्भ:- मा.अतिरिक्त आयुक्त यांचे जा.क्र.जस/६/कावि/६४८/२०१३ दि.७/१०/२०१३

मा.अतिरिक्त आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा ३१ वा वर्धापनदिन दिनांक ११/१०/२०१३ रोजी साजरा करण्यात येणार आहे. या वर्धापनदिनानिमित्त महापालिकेच्या प्रशासकिस इमारत व प्रा.रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह येथे विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे. या कार्यक्रमांतर्गत क्रीडा स्पर्धा, सनई चौघडा वादन, मनपा कर्मचारी ऑर्केस्ट्रा, फ्लेक्स बॅनर स्टेज सजावट, कविसंमेलन होम मिनिस्टर इ.मानधन, विविध स्पर्धेतील विजेत्यांसाठी पारितोषिकांसाठी खरेदी याकरिता र.रु. १,८०,००० /- (अक्षरी र.रु.एक लाख ऐंशी हजार फक्त) इतका खर्च अपेक्षित आहे. त्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४३०३ विषय क्रमांक – ६०
दिनांक – ९/१०/२०१३
सुचक – मा.छाया साबळे अनुमोदक – मा.सुनिता वाघेरे
संदर्भ:- मा. छाया साबळे, मा.सुनिता वाघेरे यांचा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे झोनिपू स्थापत्य विभागातील सन २०१३ – १४ चे अंदाजपत्रकात प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे वाढ/घट करणेस मंजूरी देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.७,५०,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा. सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(जगताप नवनाथ दत्तु)
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८.नगरसचिव विभाग,
क्रमांक - नस/४/कावि/ ९५० /२०१३
दिनांक - १४/१०/२०१३.

नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.